# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ५
## सभावृत्तांत

दिनांक :- ०७/०८/२०१८

वेळ :- दुपारी १२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०७/०८/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
५. मा.मोरेश्वर महादु भोंडवे
६. मा.नामदेव जनार्दन ढाके
७. मा.सचिन बाजीराव चिंचवडे
८. मा.सुरेश शिवाजी भोईर
९. मा.अपर्णा निलेश डोके
१०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
११. मा.राजेंद्र तानाजी गावडे
१२. मा.उषा दिलीप काळे
१३. मा.संतोष अंकुश कोकणे
१४. मा.बिभीषण चौधरी, नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, मा.अकबर शेख, उपअभियंता, विद्युत विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.एच.पी.बन्सल, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.राजेंद्र इंगळे, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एस.एन.अहिरे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.एस.जे.हरिदास, उपअभियंता, झोनिपु विभाग, मा.सगेदे एम.आर, कार्यालयीन अधिक्षक, अतिक्रमण प्रमुख मा.के.बी.पारोळे, मुख्य आरोग्य निरिक्षक, ब क्षेत्रीय कार्यालय, , श्री.कुलकर्णी आर.पी. कनिष्ठ अभियंता श्री.घेरडे ए.टी., श्री.आर.डी.शिंदे, सर्व्हेअर नगररचना विभाग, इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवडे अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक ४, दिनांक ०३/०७/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.सन्मा.सदस्य व मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक २ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यापर्यंत रस्ता बीआरटीएस कॉरीडोर म्हणून विकसित करणेत आलेला आहे. या रस्त्यामधील काळेवाडी पवना नदी ते चिंचवड लिंकरोड व पुणे मुंबई लोहमार्ग व महामार्ग यांना ओलांडून ऑटोक्लस्टर बाजूकडे उतरणारा उडडाणपुल बांधणेत आला आहे. या उडडाण पुलावरुन चिंचवड लिंकरोड येथे उतरण्यासाठी व चढण्यासाठी रॅम्प / लुप बांधणे आवश्यक आहे. सदर लुप / रॅम्प बांधल्यास चिंचवड येथील नागरीकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार हे. तसेच यामुळे पिंपरी कॅम्प रिव्हर रोड या ठिकाणी सध्या होणारी वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होईल. सदर रॅम्प व/ लुपसाठीचे जागेचा मंजूर विकास योजनेमध्ये तरतुद नाही त्यामुळे सदर रॅम्प लुपसाठी आवश्यक जागेसाठी मौजे-चिंचवड येथील स.नं.२६२, २६६, २६७ मधील क्षेत्रावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ नुसार रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे.

तरी सदर रॅम्प / लुपसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये १८ मी. रुंदीचा रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास व सदर रस्ता घोषीत करणेकामी विहीत कार्यवाही पुर्ण करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.राजेंद्र नानाजी गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मौजे-रावेत येथील सर्व्हे नं.१०९/२ मधील रहिवाशी विभागातील मिळकतधारकांना रस्त्याची आवश्यकता आहे. सदर मिळकतीसाठी १० फुट रुंदीचा खाजगी ले आऊटमधील रस्ता आहे. तरी सदरचा रस्ता ६ मीटर करणे आवश्यक आहे.

ठराव क्रमांक २४ दिनांक १२/९/२०१२ च्या अनुषंगाने नगररचना विभागाकडील नोटीस क्रमांक ५४० दिनांक ४/५/२०१७ अन्वये मा.आयुक्त कक्षामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये सुनावणी घेणेत आली होती सदरच्या सुनावणीनुसार मा.आयक्त यांनी दिनांक २८/६/२०१७ रोजीच्या नगररचना विभागाकडील मान्य टिपणीनुसार सदरचा रस्ता १२ मीटर करणेचा प्रस्ताव अमान्य केलेला असून तो पोलाईट बिल्डर व गजानन महाराज मेन्टेनन्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित रावेत या दोघांच्या सहमतीन तो ६ मीटर करणेस सहमती दर्शवली आहे.

तरी मौजे-रावेत येथील ए.बी.पाटील पब्लिक स्कूल समोरील १८ मीटर डी.पी.रस्त्यापासून सर्व्हे नं.१०९/२ यांच्या खाजगी लेआऊटमध्ये असलेल्या रस्ता हा ६ मीटर विकास आराखडया व्यतिरिक्त (Non Dp) रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करण्याची कार्यवाही करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.संगितताताई राजेंद्र भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ आदर्शनगर, पवनानगर व विजयनगर येथील नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.उषा दिलीप काळे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. १८
दिनांक ०७/०८/२०१८
सुचक : मा.राजेंद्र तानाजी गावडे

विषय क्र. १
विभाग - भुमि जिंदगी ब क्षेत्रीय कार्या.
अनुमोदक: मा.नामदेव ढाके

संदर्भ :- क्रमांक बक्षे:४:कावि:२७६/२०१८ दिनांक १८/६/२०१८ रोजीच मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव.

आठवडे बाजारासाठी मनपाकडील मोकळे मैदाने / जागा भाडयाने देण्याची नियमावली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द करण्यात आली आहे. त्या नियमावलीमध्ये मनपा जागा मान्यतेची कार्यपध्दतीमध्ये भाग क्र.२ मध्ये आठवडे बाजारासाठी मनपा जागा देतांना त्यापुर्वी संबंधीत प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक असे नमुद करण्यात आले आहे.

कृषी पणन मंडळ पुणे यांनी चिंचवड केशवनगर आरक्षण क्रमांक २३३ मधील मोकळी जागा मे राधाबाई ॲग्रो फार्मर्स प्रॉ.कंपनी लि. कोथरुड ता.हवेली जि.पुणे या आयोजकामार्फत शेतकरी आठवडे बाजार आयोजित करण्यासाठी भाडे तत्वावर मिळणेबाबत पत्रान्वये कळविले आहे.

तरी कृषी पणन मंडळ पुणे याचेमार्फत आयोजक मे राधाबाई ॲग्रो फार्मर्स प्रॉ.कंपनी लि. कोथरुड ता.हवेली जि.पुणे यांना चिंचवड केशवनगर येथील आरक्षण क्रमांक २३३ मधील जागा शेतकरी आठवडे बाजारासाठी भाडेतत्वावर देणेकामीचा प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. १९
दिनांक ०७/०८/२०१८
सुचक : मा.राजेंद्र तानाजी गावडे

विषय क्र. २
विभाग - नगररचना व विकास विभाग
अनुमोदक: मा.नामदेव ढाके

संदर्भ :- मा.राजेंद्र तानाजी गावडे यांचा दिनांक ७/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हददीतील काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यापर्यंत रस्ता बीआरटीएस कॉरीडोर म्हणून विकसित करणेत आलेला आहे. या रस्त्यामधील काळेवाडी पवना नदी ते चिंचवड लिंकरोड व पुणे मुंबई लोहमार्ग व महामार्ग यांना ओलांडून ऑटोक्लस्टर बाजूकडे उतरणारा उडडाणपुल बांधणेत आला आहे. या उडडाण पुलावरुन चिंचवड लिंकरोड येथे उतरण्यासाठी व चढण्यासाठी रॅम्प / लुप बांधणे आवश्यक आहे. सदर लुप / रॅम्प बांधल्यास चिंचवड येथील नागरीकांना मोठया प्रमाणात फायदा होणार आहे. तसेच यामुळे पिंपरी कॅम्प रिव्हर रोड या ठिकाणी सध्या होणारी वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होईल. सदर रॅम्प / लुपसाठीचे जागेचा मंजूर विकास योजनेमध्ये तरतुद नाही त्यामुळे सदर रॅम्प / लुपसाठी आवश्यक जागेसाठी मौजे-चिंचवड येथील स.नं.२६२, २६६, २६७ मधील क्षेत्रावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ नुसार रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे.

तरी सदर रॅम्प / लुपसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये १८ मी. रुंदीचा रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास व सदर रस्ता घोषीत करणेकामी विहीत कार्यवाही पुर्ण करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २० | विषय क्र. ३

दिनांक ०७/०८/२०१८ | विभाग - नगररचना व विकास विभाग

सुचक : मा.संगिता राजेंद्र भोंडवे | अनुमोदक: मा.बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ :- मा.संगिता राजेंद्र भोंडवे यांचा दिनांक ७/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील मौजे-रावेत येथील सर्व्हे नं.१०९/२ मधील रहिवाशी विभागातील मिळकतधारकांना रस्त्याची आवश्यकता आहे. सदर मिळकतीसाठी १० फुट रुंदीचा खाजगी ले आऊटमधील रस्ता आहे. तरी सदरचा रस्ता ६ मीटर करणे आवश्यक आहे.

ठराव क्रमांक २८ दिनांक १२/९/२०१२ च्या अनुषंगाने नगररचना विभागाकडील नोटीस क्रमांक ५४० दिनांक ४/५/२०१७ अन्वये मा.आयुक्त कक्षामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये सुनावणी घेणेत आली होती सदरच्या सुनावणीनुसार मा.आयुक्त यांनी दिनांक २८/६/२०१७ रोजीच्या नगररचना विभागाकडील मान्य टिपणीनुसार सदरचा रस्ता १२ मीटर करणेचा प्रस्ताव अमान्य केलेला असून तो पोलाईट बिल्डर व गजानन महाराज मेन्टेनन्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित रावेत या दोघांच्या सहमतीने तो ६ मीटर करणेस सहमती दर्शवली आहे.

तरी मौजे-रावेत येथील ए.बी.पाटील पब्लिक स्कूल समोरील १८ मीटर डी.पी.रस्त्यापासून सर्व्हे नं.१०९/२ यांच्या खाजगी लेआऊटमध्ये असलेल्या रस्ता हा ६ मीटर विकास आराखडयाव्यतिरिक्त (Non Dp) रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करण्याची कार्यवाही करणेस तसेच सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर कार्यवाही होणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. २१ | विषय क्र. ४

दिनांक ०७/०८/२०१८ | विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.उषा दिलीप काळे | अनुमोदक: मा.संतोष अंकुश कोकणे

संदर्भ :- मा.उषा दिलीप काळे यांचा दिनांक ७/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव..

आदर्शनगर, पवनानगर व विजयनगर येथील पुढे नमुद केलेप्रमाणे १) आदर्शनगर कॉलनी नं.१, २) आदर्शनगर कॉलनी नं.२ ३) गोकुळवाडा कॉलनीनं.१, ४) गोकुळवाडा कॉलनी नं.१, ५) गणराज कॉलनी ६) पवनानगर कॉलनी नं.१, (श्रीकृष्ण कॉलनी) ७) पवनानगर कॉलनी नं.२ ८) पवनानगर कॉलनी नं.३ ९) पवनानगर कॉलनी नं.४ १०) पवनानगर कॉलनी नं.५ ११) मोरया कॉलनी नं.१, १२) मोरया कॉलनी नं.२ १३) नवरत्न चौक, १४) शिव शक्ती कॉलनी १५) वैभव कॉलनी (जैन मंदिर) १६) वैभव कॉलनी १७) समश्रृंगी कॉलनी १८) क्रांती चौक १९) गणेश कॉलनी, २०) शांती कॉलनी नं.१ २१) शांती कॉलनी नं.२, २२) शांती कॉलनी नं.३ २३) सहारा कॉलनी २४) ओंकार कॉलनी नं.१, २५) ओंकार कॉलनी नं.२, २६) ओंकार कॉलनी नं.३, २७) हरदेव कॉलनी २८) किनारा कॉलनी नं.ए, २९) किनारा कॉलनी नं.बी, ३०) किनारा कॉलनी नं. सी ३१) अष्ट विनायक कॉलनी ३२) साई कॉलनी, ३३) स्वामी समर्थ कॉलनी ३४) समर्थ कॉलनी नं.१, ३५) समर्थ कॉलनी नं.२, ३६) समर्थ कॉलनी नं.३ ३७) वर्धमान

भुमी सोसायटी ३८) साई प्रितम कॉम्प्लेक्स सोसायटी ३९) के.डी.एम. प्लॅनेट सोसायटी ४०) सुखवानी डिस्कवर सोसायटी ४१) साई इनक्ल्यू सोसायटी ४२) साई रेसिडेन्सी सोसायटी ४३) गुलमोहर गार्डन, ४४) संत निरंकारी भवन ४५) अमृतधाम सोसायटी ४६) आदि रेजेन्सी सोसायटी ४७) आदि अम्मा ब्लिस सोसायटी ४८) स्मृती संकुल सोसायटी ४९) स्मृती गार्डन सोसायटी ५०) साई एमरेल्ड सोसायटी ५१) अक्रोपॉलिस सोसायटी ५२) जय गणेश क्लासिक ५३) साई प्रितम पार्क ५४) संस्कारसोसायटी ५५) अल्फान्सा पॅराडाईज सोसायटी इत्यादी नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.करुणा शेखर चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/९८५/२०१८.
दिनांक : ७ / ९ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना